।। ॐ ब्रह्मणस्पतये नमः ।।

# मायूरवैभव-श्लोकषोडशी

## (भुजंगप्रयात श्लोक)

मयूरेश नामें महाक्षेत्र आहे । तिथे मूर्तिमान श्रीगणाधीश राहे ।।
सवें सिद्धिबुद्धि उभ्या दोन भागी, तया सेवुनी मुक्त व्हा लागवेगी ।।१।।

दिसे सिंदुरारक्त शुंडाल वक्त्र । तसा भव्य देही चतुर्हस्तधार ।।
त्रिनेत्र प्रभू ढुंढिराज प्रसन्न । पहा देऊळी सत्य हा ब्रह्मपूर्ण ।।२।।

इथे जन्मला दैवयोगे कुणीही । तया मुक्तीसाठी नको यत्न कांही ।।
असो पातकी त्या नसे याम्यलोक । श्रुती गात हें क्षेत्र महात्म्य देख ।।३।।

सुदैवें कुणा क्षेत्रिं या मृत्यु येई । जळे पाप जन्मांतरी संचिलेही ।।
पुन्हां जन्म ना निश्चये ब्रह्मभूत । जसा योगिं तैसा पहा जंतु होत ।।४।।

स्मरे कोणि कोठे महाक्षेत्र नाम । मयूरेश बा आठवी ब्रह्मधाम ।।
सदा कीर्तनीं बोधि अन्या सुभावें । तया ज्ञानवैराग्य मोक्षादि पावे ।।५।।

तुला ये न काशी-प्रयागादि पुण्यां । इया क्षेत्र-पुण्यप्रभावांश माना ।।
गुणें कोटिकोट्याधिका पुण्यरीती । फळ क्षेत्रसेवा करा मायुरीं ती ।।६।।

इथे पूर्वभागी महाविष्णु राहे । तसा शंभू तो दक्षिणे राहता हे ।।
महाशक्ती राहे पहा पश्चिमेसी । तया सूर्य तो उत्तरी पूर्णवासी ।।७।।

जगीं जेतुकी वैष्णवी क्षेत्रसंख्या । तया सेवितां पुण्य जे प्राप्त लोकां ।।
मिळे सर्व ते पूर्व दिग्-द्वारयात्रे । इथे सत्य हें जाणिजे तत्वसारे ।।८।।

शिवक्षेत्र माहात्म्य विश्वीं अपार । फळे सर्व ते क्षेत्रिं या पुण्यभार ।।
जरी दक्षिणद्वार-यात्रा करावी । शिवक्षेत्र यात्रा तरी पूर्ण व्हावी ।।९।।

इथे पश्चिम द्वारयात्रा घडेल । तरी शक्ति सेवार्थ गाठी पडेल ।।
जगी क्षेत्रसंख्या तिथे जी इथे ती । असे पुण्यदे सेवनी सर्वरीती ।।१०।।

महा सौर पुण्यस्थलें या जगी जी । इथे उत्तरीं राहिली पुण्य-काजीं ।।
फळे पुण्य एक्या महाद्वार यात्रें । मयूरेश्वरी साधितां सत्य सारें ।।११।।

अहो मुक्तिही जी स्वयं इच्छितेकी । मला मृत्यु येवो तरी सार्थ लोकी।।
असे क्षेत्र माहात्म्य नाहींच कोठे । पहा वेदशास्त्री नको वाद हट्टे ।।१२।।

(अनु.) हेरंबराज बालें मी गाइलें प्रेमवैभव ।।
ध्वानी धरूनी सेवावें गाणेशीं तें सगौरव ।।
।। इति श्रीमद्गणेशार्पणमस्तु ।।